# डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन जीवनचरित्र

अध्यक्ष महोदय ,

सन्माननीय व्यासपीठ आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला शिक्षक दिनानिमित्त दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

प्रथमतः सर्व गुरुजनांना माझा साष्टांग नमस्कार. आज ५ सप्टेंबर,डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस.

राधाकृष्णन हे तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध होते.

जगभर त्यांची तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्धी होती. जवाहरलाल नेहरु त्यांच्या लेखनाचे चाहते होते. त्यांच्या जीवनात प्रमुख तीन प्रश्न होते. आणि कुणाशीही ते याच तीन प्रश्नांच्या अनुरोधाने बोलत. पहिला प्रश्न असा की, नीतिमान पण चिकित्सक, विज्ञानोन्मुख पण अध्यात्मप्रवण असा नवा माणूस कसा निर्माण करता येईल? या दृष्टीने शिक्षणाचा काही उपयोग होऊ शकेल का?

दुसरा प्रश्न असा होता की, प्राचीन भारतीय तत्त्वचिंतन सर्व जगाला आधुनिक भाषाशैलीत, आधुनिक पद्धतीने कसे समजावून सांगता येईल? भारतीय तत्त्वचिंतनाचे वैभव जगाला नेमकेपणाने कसे सांगावे? कसे पटवून द्यावे?

तिसरा प्रश्न असा होता की; मानव जातीचे भवितव्य घडवण्यासाठी सांस्कृतिक संचिताचा उपयोग किती?

त्यांना राजकारणात रस नव्हता. संविधान सभेत येण्यापूर्वी काही वर्षे ते प्राचार्य होते. नंतर बनारस विद्यापीठाचे ते कुलगुरु होते.

१० वर्षे ते उपराष्ट्रपती होते. १९६२ मध्ये ते भारताचे राष्ट्रपती झाले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन थोर आचार्य होते. त्यांच्या तत्त्वचिंतक तपस्वी व्यक्तिमत्त्वामुळे शिक्षक हे पद भूषणावह ठरले आहे.

अशा थोर नेत्याला माझे कोटी कोटी सलाम.

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो. जय हिंद ...जय महाराष्ट्र https:/activeguruji.com

# भारताचा राष्ट्रध्वज

अध्यक्ष महोदय ,

सन्माननीय व्यासपीठ आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला भारताच्या राष्ट्रध्वजाविषयी दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

२२ जुलै १९४७ रोजी घटना समितीच्या बैठकीत `तिरंगी ध्वज` भारताचा अधिकृत राष्ट्रीय ध्वज म्हणून स्वीकृत करण्यात आला.

वरती गर्द केशरी,मध्यभागी पांढरा आणि खालच्या बाजूला गर्द हिरवा,अशा क्रमाने हे तीन रंग आहेत. मधल्या पांढऱ्या पट्ट्यावर निळ्या रंगाचे अशोकचक्र असून ते सारनाथ येथील सिंहमुद्रेवर असलेले अशोकचक्र आहे.चक्राला २४ आरे आहेत.पिंगली वेंकय्या यांनी तिरंग्याची रचना केली आहे. भारतीय राष्ट्रध्वजाच्या लांबी व उंचीचे प्रमाण ३:२ असे आहे, तसेच राष्ट्रध्वज खादीच्या अथवा रेशमाच्या कापडाचा बनवला जावा असा सरकारी नियम आहे.

सर्वपल्ली राधाकृष्ण यांनी भारतीय राष्ट्रध्वजाच्या एकूण रचनेचे महत्त्व चांगल्या प्रकारे विशद केले आहे.वरच्या भागात गडद केशरी रंग आहे.या रंगातून त्याग, धैर्य याचा बोध होतो.मधल्या भागात पांढरा रंग आहे.या रंगातून प्रकाशाचा आणि सत्यमार्गाचा शांती, सत्य, व पावित्र्याचा बोध होतो. खालील भागात गडद हिरवा रंग आहे. हा रंगातून निसर्गाशी वा भूमीशी असलेले नाते दर्शवितो, निष्ठा व समृद्धीचा बोध होतो. निळ्या रंगाचे अशोक चक्र हे सागराप्रमाणे अथांगता व कालचक्राचे व त्यासोबत बदलत जाणारे जग सूचित करतो. जीवन गतिमान असावे व भारतीयांनी शांततापूर्ण आगेकूच करावी असे दर्शविते.

भारत देशाच्या अस्मितेचे प्रतिक असलेला राष्ट्रध्वज तिरंगा राष्ट्रीय सण व अन्य महत्त्वपूर्ण दिवशी सन्मानपूर्वक फडकवला जातो.

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ......जय महाराष्ट्र !

**अधिक भाषणे**

https:/activeguruji.com

# लेक वाचवा देश वाचवा

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला "लेक वाचवा देश वाचवा" या विषयावर दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

आज आपण बर्याच ठिकाणी लेक वाचवा देश वाचवा,स्त्री जन्माचे स्वागत करू असे ऐकतो पण तरीही पोटातच मुलीची हत्या करतो.

का हा मुलींवर अन्याय करता ?

मुलीनाही जगण्याचा हक्क आहे,त्यांना जगू द्या.पोटातील हे छोटेसे बाळही म्हणत असेल ,मला जगू द्या.

फक्त मुलगाच वंशाचा दिवा असतो का?

नाही ना ?

मग का मारता मुलीना?

मुलीसुद्धा आई वडिलांचा आधार बनतात.मुलींचाही गौरव झाला पाहिजे.मुलीना मारू नका,त्यांना जन्माला घाला.

मी सुद्धा एक मुलगी आहे याचा मला अभिमान आहे.

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करते.

जय हिंद ......जय महाराष्ट्र !


अधिक भाषणे

https:/activeguruji.com

# सर्वसमावेशक विचार

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे.शिक्षणामुळे माणसाची प्रगती होते.शिक्षणाला फार महत्व आहे.म्हणून तर म्हणतात,शिकाल तर टिकाल.

मुला मुलींमध्ये भेदभाव करू नका.मुलीसुद्धा आई वडिलांचा आधार बनतात.मुलींचाही गौरव झाला पाहिजे.मुलीना मारू नका,त्यांना जन्माला घाला.

मुलीनाही जगण्याचा हक्क आहे,त्यांना जगू द्या.पोटातील हे छोटेसे बाळही म्हणत असेल ,मला जगू द्या.

सर्वांनी शौचालय बांधा व त्याचा वापर करा.जातीभेद मानू नका.आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत.

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ……जय महाराष्ट्र !

अधिक भाषणे
https:/activeguruji.com

# राजमाता जिजाबाई

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला राजमाता जिजाबाई यांच्याविषयी दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

` जिच्या हाती पाळण्याची दोरी ती राष्ट्राचा उद्धार करी `.

जिजाबाईनी शिवरायांना घडवले.त्यामुळे त्यांच्या हातून स्वराज्य निर्मितीचे पवित्र कार्य घडले.सर्व जनता सुखी झाली.

माता कशी असावी याचा आदर्श जिजाबाईंनी निर्माण केला.मुला मुलींमध्ये भेदभाव करू नका.

जिजाबाईंना माझे कोटी कोटी प्रणाम.एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ……जय महाराष्ट्र !

अधिक भाषणे
https:/activeguruji.com

# महात्मा गांधी

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला महात्मा गांधी यांच्याविषयी दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

महात्मा गांधी यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरित केले.

रवींद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना `महात्मा` ही उपाधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना अनधिकृपणे भारताचे राष्ट्रपिता  म्हटले जाते.

सुभाषचंद्र बोस यांनी पहिल्यांदा त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधले, असे म्हणतात. महात्मा गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते.

२ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते. अशा थोर नेत्यास माझे कोटी कोटी प्रणाम. एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ……जय महाराष्ट्र !

अधिक भाषणे

https:/activeguruji.com

# लोकमान्य टिळक

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला लोकमान्य टिळक यांच्याविषयी दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ मध्ये रत्नागिरी जिल्हातील  मधल्या टिळक आळीत, एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला.

बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसेनानी,राजकारणी, तत्त्वज् ,संपादक,लेखक आणि वक्ते होते. `लोकमान्य` या उपाधीने त्यांचा उल्लेख केला जातो.

``स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच ``हा नारा त्यांनी दिला.

लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल यांची राजकीय मते एकमेकांशी जुळणारी होती. यामुळे या त्रिकुटाला लाल–बाल–पाल असे नामकरण मिळाले.टिळक जहालवादी होते.

१८९३ साली टिळकांनी  गणेशोस्तव आणि १८९५ साली शिवाजी महाराज जयंती हे सार्वजनिक व सामाजिक सण म्हणून साजरे केले. अशा महान नेत्याचा मृत्यू १ऑगस्ट १९२० साली झाला. अशा थोर नेत्यास माझे कोटी कोटी प्रणाम. एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ......जय महाराष्ट्र.....

अधिक भाषणे
https:/activeguruji.com

# छत्रपती शिवाजी महाराज

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी डोंगरी किल्ल्यावर १६३० मध्ये शिवाजीचा जन्म झाला.महाराष्ट्रात, छत्रपती शिवाजी हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिव, शिवराय, शिवा अशा अनेक नावांनी ओळखले जातात.शिवाजीचा जन्मदिवस हा 'शिवजयंती' म्हणून साजरा होतो.

जिजामाता या शिवाजीमहाराजांच्या आद्यगुरू होत.हिंदवी स्वराज्यस्थापनेचे स्वप्न साकार करायला शिवाजीमहाराजांना जिजाबाईंनी स्फूर्ति दिली.

शिस्तबद्ध लष्कर व सुघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर शिवाजीने एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले.भूगोल, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्ची करणारे नेमके हल्ले यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले.आपल्या वडिलांकडून मिळालेल्या २,००० सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर शिवाजी महाराजांनी उभे केले.किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले.राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले.

६ जून १६७४ रोजी शिवाजीराजांना रायगडावर राज्याभिषेक करण्यात आला.

अशा थोर राज्यास माझे कोटी कोटी प्रणाम.एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ......जय महाराष्ट्र !

**अधिक भाषणे**
https:/activeguruji.com

# पंडित जवाहरलाल नेहरू

अध्यक्ष महोदय ,

पूज्य गुरुजनवर्य आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला " पंडित जवाहरलाल नेहरू " यांच्या बद्दल दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

जवाहरलाल मोतीलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान व भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अग्रणी असलेले भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे लोकप्रिय नेते होते. ते 'पंडित नेहरू' व 'चाचा नेहरू' या नावांनीही ओळखले जातात.

श्री पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म अलाहाबाद येथे काश्मिरी पंडितांच्या घरी १४ नोव्हेंबर ,१८८९रोजी झाला.७ फेब्रुवारी, १९१६  वयाच्या २६ व्या वर्षी त्यांचा विवाह कमला कौल यांच्याशी झाला.१९१७ साली त्यांना इंदिरा प्रियदर्शिनी ही कन्या झाली.

जवाहरलाल नेहरू यांचे सुरुवातीचे शिक्षण घरीच खाजगी शिकवण्यांद्वारे झाले. वयाच्या १५ व्या वर्षी ते इंग्लंडला शिक्षणाकरिता गेले.कॅम्ब्रीज विद्यापीठातून त्यांनी सामान्य विज्ञान (नॅचरल सायन्स) या विषयात पदवी घेतली. ते १९१२ साली भारतात परतले आणि सरळ राजकारणात उतरले.

विद्यार्थी दशेत असताना सुद्धा त्यांना पारतंत्र्यातील विविध देशांच्या स्वातंत्र्यसंग्रामात रुची होती. त्यामुळे भारतात परतल्यावर ते आपसूखच स्वातंत्र्य चळवळीत खेचले गेले.

१९१२ मध्ये झालेल्या बंकीपूर काँग्रेस अधिवेशनाला ते उपस्थित होते. १९१९ मध्ये ते होमरूल चळवळीचे अलाहाबादचे अध्यक्ष बनले. १९१६ मध्ये ते प्रथमच महात्मा गांधीना भेटले आणि त्यांच्यापासून विलक्षण प्रेरित झाले. १९२० साली त्यांनी उत्तर प्रदेशच्या प्रतापगढ जिल्ह्यात पहिला किसान मोर्चा काढला. १९२०–२२ दरम्यान असहकार आंदोलनामुळे त्यांना दोनदा कारावास भोगावा लागला.

सप्टेंबर १९२३ मध्ये पंडित नेहरू अखिल भारतीय काँग्रेस परिषदेचे सचिव बनले..

७ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबई अधिवेशनात त्यांनी 'भारत छोडो' ही क्रांतीकारी घोषणा केली.

पं. नेहरूंनी ९ वेळा कारावास भोगला. ६ जुलै, १९४६ रोजी त्यांना काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. १९५४ पर्यंत त्यांनी पदभार सांभाळला.पंडित जवाहर नेहरू यांना लहान मुले व गुलाबाची फुले खुप आवडत.अशा थोर नेत्यास माझे कोटी कोटी प्रणाम .

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करते. जय हिंद ......जय महाराष्ट्र ! https:/activeguruji.com

# शिक्षक दिन

अध्यक्ष महोदय,

सन्माननिय व्यासपीठ आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,

आज मी तुम्हांला शिक्षक दिनानिमित्त दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.

प्रथमतः सर्व गुरुजनांना माझा साष्टांग नमस्कार.

आज ५ सप्टेंबर,डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस.आज मी आपणाला डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या बद्‌दल माहिति सांगणार आहे.

डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे दुसरे राष्ट्रपती ,नामांकित राजनीतितज्ज्ञ, तत्त्वज्ञ, प्राध्यापक व शिक्षणतज्ज्ञ होते.त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी दक्षिण भारतात तिरुत्तनी या ठिकाणी झाला.

भारतीय तत्त्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून ते ऑक्सफर्डमध्ये नावाजले गेले. त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून ऑक्सफर्ड विद्यापीठाने त्यांच्या नावाने 'राधाकृष्णन मेमोरियल बिक्वेस्ट' हा पुरस्कार ठेवला आहे.

अशा थोर नेत्याला माझे कोटी कोटी सलाम.

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.

जय हिंद ......जय महाराष्ट्र !

अधिक भाषणे
https:/activeguruji.com

# शिक्षक दिन

**अध्यक्ष महोदय,**

**सन्माननिय व्यासपीठ आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,**

**आज मी तुम्हांला शिक्षक दिनानिमित्त दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.**

**गुरु ब्रम्हा गुरु विष्णु गुरु देवो महेश्वर l गुरु साक्षात् परब्रह्म, तस्मै: श्री गुरुवे नम:ll**

**या उक्तीप्रमाणे प्रथमतः सर्व गुरुजनांना माझा साष्टांग नमस्कार.**

**आज ५ सप्टेंबर,डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस.आज मी आपणाला शिक्षकांचे आपल्या जीवनातील महत्त्व सांगणार आहे.**

**छोट्या बालकाचे देशाचा उत्कृष्ट नागरिक म्हणून परिवर्तन करण्याचे काम शिक्षक करत असतो.राष्ट्र उभारणीत निरपेक्ष व सेवाभावीपणाने शिक्षक काम करत असतो.**

**`जे जे आपणाशी ठावे ,ते दुसऱ्याशी सांगावे` या प्रमाणे शिक्षक आयुष्यभर ज्ञानदान करत असतो.**

**एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.**

**जय हिंद ……जय महाराष्ट्र !**

**अधिक भाषणे**

[https:/activeguruji.com](https:/activeguruji.com)

# शिक्षक दिन

**अध्यक्ष महोदय,**

**पूज्य गुरुजनवर्ग आणि येथे जमलेल्या माझ्या बालमित्रांनो,**

**आज मी तुम्हांला शिक्षक दिनानिमित्त दोन चार शब्द सांगणार आहे ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावे ही विनंती.**

**प्रथमतः सर्व गुरुजनांना माझा साष्टांग नमस्कार.**

**आज ५ सप्टेंबर,डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस.आज मी आपणाला शिक्षकांबद्दल माहिती सांगणार आहे.मातीच्या गोळ्याला आकार देण्याचे काम शिक्षक करत असतो. पण आता परिस्थिती बदलली आहे ,शाळेत येणारा प्रत्येक बालक आपल्या पूर्वज्ञानाने समृद्ध होऊन शाळेत येत आहे.पालक सुजान झाला आहे, शिक्षकांकडून त्याच्या अपेक्षा वाढल्या आहेत.संगणक व मोबाईल मुले मुलेही आपले ज्ञान वाढवत आहेत.**

**शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्यामुळे अनेक मुले समृद्ध होत आहेत.देशाचे भावी आधारस्तंभ घडवणाऱ्या शिक्षकाला माझे त्रिवार वंदन.**

**एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो.**

**जय हिंद ……जय महाराष्ट्र !**

**अधिक भाषणे**
https:/activeguruji.com